**शासकीय सेवेत असतांना दिवंगत/अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.**
**विहित संगणक ज्ञानाची अर्हता प्राप्त करण्याविषयी**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : अकंपा- १०००/प्र.क्र. ५९/२०००/आठ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ नोव्हेंबर, २००२.

वाचा: १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा- १०००/प्र.क्र. ५९/२०००/आठ, दिनांक २४-९-२००१.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण- २०००/प्र.क्र. ५/२००१/३९, दिनांक २०-७-२००२

**शासन निर्णय**

संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद ३ अनुसार दिनांक २४-९-२००१ नंतर अनुकंपा तत्वावर गट 'क' मधील पदावर (वाहनचालक वगळून) नियुक्त झालेल्या/होणा-या उमेदवारांनी नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहित संगणक ज्ञानाची अर्हता प्राप्त करणे आवश्यक करण्यात आले आहे. सदर अट यापुढे देखील तशीच कायम राहिल.

२. सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन- ३९ च्या वरील क्रमांक २ येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २४-९-२००१ मधील परिच्छेद ४ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

दिनांक २४-९-२००१ रोजी किंवा त्यापूर्वी ज्या उमेदवारांना गट 'क' मधील पदांवर (वाहनचालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आलेली आहे त्यांना संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक २० जुलै, २००२ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या विविध माध्यमाद्वारे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान प्राप्त करुन महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या एम.एस- सी.आय.टी परीक्षा देवून व आणि ती परीक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यांनी

संगणक हाताळणी वापराबाबतचे प्रशिक्षण पूर्ण करुन त्यासंदर्भातील प्रमाणपत्र सादर करण्याची संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक २४-९-२००१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेली मुदत आता दिनांक ३१ डिसेंबर, २००२ ऐवजी दिनांक २० जुलै, २००३ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

३. सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी वरील निदेशांचे कटाक्षाने पालन करावे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

प्रकाश लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई .
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई .
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग , मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई.
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व हकदारी), मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व परीक्षा), मुंबई.
महालेखापाल महाराष्ट्र-२ (लेखा व हकदारी), नागपूर.
महालेखापाल महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखा) कोकण भवन , नवी मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग /कार्यासन १२, १३-अ, १४-अ, १९ २८, २८-अ, ३४, ३४-अ, ३७
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
सर्व मंत्रालयीन विभाग (सामान्य प्रशासन विभाग धरुन)
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
निवड नस्ती/कार्यासन आठ
* पत्राने